दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ३४७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.१३ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल मिरची गल्ली मधील दुकानांना आग ; मोठ्या प्रमाणात नुकसान



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील मिरची गल्लीमधील दुकानांना शुक्रवारी रात्री ११ च्या सुमारास आग लागली. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असल्याचे बोलले जात आहे. या आगीत दुकानांचे मोठे नुकसान झाले आहे. या आगीमुळे चार दुकानातील माल जळून खाक झाला आहे.

मिरची गल्ली हा रहदारीचा परिसर असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वा–तावरण पसरले होते. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने ताबडतोब घटनास्थळी धाव घेतली आणि आग आटोक्यात आणली. यामध्ये सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. दरम्यान आमदार प्रशांत ठाकुर, उप महापौर सीता पाटील, पनवेल पालिकेचे विरोधी डॉ प्रितम जनार्दन म्हात्रे, नगरसेवक मुकीद काझी, मा.नगरसेवक लतिफ शेख, संजय जैन, पवन सोनी, यतीन मानकामे, जवाद काझी, कुणाल कुरघोडे, आकाश दलाल आदींनीसह अनेकांनी मदतीसाठी धाव घेतली. आपत्कालीन विभागाचे अधिकारी, स्थानिक पोलीस प्रशासन व महानगरपालिकेचे अधिकारी यांना मदतीसाठी आवाहन करण्यात आले. के पी गुप्ता, भगवान पाटील, महेश गुप्ता, अशोक कुमार विश्वनाथ यांच्या सामनाचे नुकसान झाले आहे. पनवेल अग्निशामक दलाचे ४ बंब आणि सिडकोचे ४ बंब यानी अवघ्या दीड तासात ही आग विझवली.



## पनवेलकरांनी दाखविले ऐक्याचे दर्शन

जेव्हा नैसर्गिक संकट येते तेव्हा पनवेलकर एकजुटीने सामोरे जावून या संकटाशी दोन हात करतात. शुक्रवारी रात्री लागलेल्या आगीचे वृत्त समजताच सर्व पनवेलकर त्या दुकानदारांच्या मदतीसाठी धावून गेले.

यावेळी सर्वांनी राजकीय जोडे बाजूला काढले होते. व जो तो आपल्या परीने आग आटोक्यात आणण्यासाठी पूर्ण प्रयत्न करीत होते. यातूनच पनवेलकरांच्या ऐक्याचे दर्शन दिसून आले.

# म्हसळा ग्रामीण रुग्णालय सहाय्यक अधिक्षकास लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले

## म्हसळ्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा ग्रामीण रुग्णालयातील सहाय्यक अधिक्षक विष्णू यशवंतराव सांभारे यांना तक्रारदार यांच्याकडून एक हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रायगड यांनी रंगेहात पकडून ताब्यात घेतले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की तक्रारदार आणि त्यांचे भाऊ यांच्या विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्याकरिता तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी अँटी करप्शन ब्युरो कार्यालयाकडे तक्रार नोंदविली होती. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/०३/२०२२ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक विष्णू सांभारे यांनी तक्रारदार यांच्याकडे २०००/– (दोन हजार रुपये) लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावर लाप्रवी, रायगड यांनी सापळ्याचे आयोजन करून विष्णू यशवंतराव संभारे (सहायक अधीक्षक ग्रामीण रुग्णालय म्हसळा) जिल्हा रायगड यांना तक्रारदार यांच्याकडून १०००/– (एक हजार) रुपयांचे लाचेची रक्कम ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथील त्यांचे कार्यालयात स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. याबाबत पुढील तपास सुरू असल्याची माहिती श्रीमती सुषमा सोनावणे (पोलीस उप अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो रायगड, अलिबाग) यांनी दिली आहे.

सदर लाचेची सापळा कारवाई पोलीस अधीक्षक डॉक्टर पंजाबराव उगले तसेच अपर पोलीस अधीक्षक अनिल घेरडीकर, लाप्रवी ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलिस उपअधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे, पोहवा अरुण करकरे, पोहवा महेश पाटील, पोहवा विनोद जाधव, पोशि सचिन पाटकर, चासपोउपनि घरत यांनी यशस्वीरित्या सापळा कारवाई केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे या धडक कारवाईने तालुक्यातील इतर शासकीय कार्यालायतील कर्मचारी वर्गाचे धाबे दणाणले असल्याची चर्चा नागरिकांमधून ऐकायला मिळत आहे.

# स्थानिक निवडणुका घेण्याचे अधिकार राज्य सरकारकडे

## विधेयकावर राज्यपालांनी केली स्वाक्षरी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**मध्यप्रदेशच्या धर्तीवर राज्य सरकारने आणलेल्या निवडणूक सुधारणा विधेयकावर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शुक्रवारी सही केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभागरचनेचे, तसेच निवडणुका घेण्याचे अधिकार या विधेयकामुळे राज्य सरकारकडे येणार आहेत. त्यामुळे ओबीसी राजकीय आरक्षणावरून निर्माण झालेल्या कोंडीतून सरकारची एका अर्थाने सुटका झाली आहे.**



राज्याचे अन्न, नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ आणि इतर मंत्री विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची राजभवन येथे भेट घेतली. त्यानंतर राज्यपालांनी सही केली.

ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा तिढा न्यायप्रविष्ट असला तरी तो सोडवण्यासाठी मदत व्हावी यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासंदर्भातील विधेयक आणले होते. दोन्ही सभागृहांत ते संमत करण्यात आले.राज्यपालांची सही झाल्याने ओबीसी आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. आता किमान सहा महिने निवडणूक घेता येणार नाही, इम्पिरिअल डेटा आम्ही तीन महिन्यांत गोळा करू, अशी माहिती मंत्री विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

या विधेयकामुळे आगामी महापालिका, नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभागरचना ठरविण्याचा, निवडणुका पुढे ढकलण्याचा अधिकार राज्य सरकारला मिळणार आहे. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्याने राजपत्र होईल. यानंतर राज्य निवडणूक आयोग याबाबत दखल घेईल.

## संक्षिप्त...

### देवेंद्र फडणवीसांना पोलिसांची नोटीस

**दै.रायगड नगरी । मुंबई**

माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना सायबर पोलिसांनी बजावलेल्या नोटिशीमुळं भाजप आक्रमक झाला असून, त्याविरोधात मोठं पाऊल उचललं आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या समर्थनार्थ भाजपचे कार्यकर्ते उद्या, रविवारी मुंबईतील बीकेसी परिसरात एकवटणार आहेत, अशी माहिती विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी दिली.

मुंबई पोलिसांच्या सायबर शाखेने ११ मार्चला नोटीस बजा–वली असून, चौकशीसाठी बीकेसी येथे बोलावले आहे, अशी माहिती आज, शनिवारी देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः दिली. आपण उद्या बीकेसीत जाणार असून, या पोलीस बदली घोटाळ्याच्या तपासात योग्य ते उत्तर देऊ, असे फडणवीस यांनी सांगितले.

त्याचवेळी मला याबाबत माहिती कशी मिळाली, कुठून मिळाली, याचे स्रोत सांगणे बंधनकारक नाही. विरोधी पक्षनेता म्हणून मला विशेषाधिकार आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले.

फडणवीस यांना पोलिसांनी बजावलेल्या नोटिशीनंतर भाजप आक्रमक झाला आहे. फडणवीसांना समर्थन देण्यासाठी भाजपचे कार्यकर्ते बीकेसीत शक्तिप्रदर्शन करणार आहेत, असं प्रवीण दरेकर यांनी सांगितलं.

ते म्हणाले की, पोलीस बदली घोटाळा प्रकरणात बीकेसीतील सायबर पोलिसांनी त्यांना नोटीस बजावली आहे. फडणवीस यांनी विधानसभेत सरकारी षडयंत्राचा पर्दाफाश केला.

# रोटरी शाम लता दीदी के नाम



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे रोटरी क्लब ऑफ रायगड आयोजित रोटरी शाम लता दीदी के नाम कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात लता मंगेशकर यांनी गायलेली गीते सादर करण्यात आली

या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे, रोटरी क्लब ऑफ उलवेचे संस्थापक रविंद्र पाटील, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन, रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर, रोटरी क्लब ऑफ पनवेल, रोटरी क्लब ऑफ नवीन पनवेल, रोटरी क्लब ऑफ सनराईज, रोटरी क्लब ऑफ खपोली, रोटरी क्लब ऑफ उलवे नोड, रोटरी क्लब ऑफ कळंबोली, रोटरी क्लब ऑफ पेन, रोटरी क्लब ऑफ अलिबाग, रोटरी क्लब ऑफ शिशोरे, रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा, रोटरी क्लब ऑफ खारघर एक्झिकीटीव्ह, रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनचे पदाधिकारी, सदस्य व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# आदर्श नागरिक म्हणून जीवन कसे जगता येईल यासाठी प्रयत्न करा : रामशेठ ठाकूर

## महात्मा फुले महाविद्यालयामध्ये पदवीदान समारंभ संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये शनिवार १२ मार्च रोजी पदवीदान समारंभचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभास रामशेठ ठाकूर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते महाविद्यालयातील पदवीधर व पदव्युत्तर स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली. उत्सा–हपूर्ण वातावरणामध्ये संपन्न झालेल्या सोहळ्याच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले व आपले मनोगत व्यक्त केले.



कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य व महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे चेअरमन रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व विशद केले. पदवी प्राप्त करणा–या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत त्यांना आदर्श नागरिक म्हणून जीवन कसे जगता येईल यासाठी प्रयत्न करा व इतर गरजुंना मदतीचा हात द्या असे ...⁄२

## सावित्री नदीवरील कोसळलेल्या पुलाशेजारील दुसऱ्या पुलावरून वाहतूक सुरू

# १६५ दिवसांत पहिला नवीन पुल उभारल्यानंतर दुसऱ्या पुलासाठी पाच वर्षे!

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महाड आणि पोलादपूरदरम्यानच्या महाड एमआयडीसीलगतच्या सावित्री नदीवरील ब्रिटीशकालीन पुल २ ऑगस्ट २०१६ च्या मध्यरात्री कोसळल्यानंतर त्याठिकाणी केवळ १६५ दिवसांमध्ये उभारण्यात आलेला पहिला नवीन पुल वाहतुकीसाठी केंद्रीय भुपृष्ठ वाहतूकमंत्री ना.नितीन गडकरी यांच्याहस्ते लोकार्पण करण्यात आल्यानंतर दुसऱ्या पुलाचे काम पूर्ण होऊन पहिल्या पुलाच्या उदघाटनप्रसंगाला तब्बल पाच वर्षे झाल्यानंतर कोणत्याही उदघाटनाविनाच वाहतूकीसाठी खुला करण्यात आला आहे. या पुलावरून उतरताना



कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांना भोरच्या दिशेनेच मंडणगड असल्याचे दर्शविणारा चुकीचा फलक लावण्यात आल्यामुळे मंडणगडच्या दिशेने जाणाऱ्या प्रवासी वाहनांना भोरच्या दिशेने जाऊन पुन्हा राजेवाडीमार्गे मंडणगडकडे जाण्याच्या उलटा प्रवास करावा लागत आहे.

महाड आणि पोलादपूर दरम्यानच्या सावित्री नदीवरील ब्रिटीश कालीन पुल कोसळल्यानंतर केवळ १६५ दिवसांमध्ये उभारण्यात यश आल्याने केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्री ...⁄२

# वाहतूक कोंडीची समस्या सुटणार तरी कधी? खोपोलीकरांचा सवाल

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शिळफाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात दर रोज वाहनांच्या लांब – लांब रांगा लागत वाहतूक कोंडी होत असल्याने याचा न हक्क त्रास स्थानिक नागरिकांना सहन करावे लागत आहे. जुन्या मुंबई –पुणे राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरी करणाचे काम खालापूर फाटा ते खोपोली पर्यंत करण्यात आले. मात्र फॉरेष्ट चेक नाका पासून ते गाजी बाबांच्या दर्गे च्या हद्दी पर्यंत रस्त्याचे रुंदीकरणाचे काम अद्याप झालेले नाहीं. त्यामुळे या भागात गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या आजतागायत कायम आहेत. याठिकाणी कोणताही अधिकारी आपली जबाबदारी स्वीकारत नाही. एकी कडे अरुंद रस्ता तर दुसरी कडे रस्त्यावर वाहने पार्किंग होत असल्याने दर रोज वाहतूक कोंडीने प्रवासी वाहन चालकां सह खोपोली करांनाच्या नाकीनऊ आले आहेत. ही



समस्या सुटणार तरी कधी? रस्त्याच्या बाजूला उभ्या हातगाध्या, बेशिस्त वाहनांची पार्किंग, दुकानांसमोर लोखंडी स्टॅन्ड बोर्ड, वाढलेल्या दुकानांचे अतिक्रमण हटणार तरी कधी? असा संताप सवाल प्रवासी वाहन चालकानं मधून होत आहे.

खोपोली शहर हे पर्यटकांसाठी प्रसिद्ध असून लोणवळा, खंडाळा, ...⁄२

# आकड्यांच्या पलीकडले...

देशाच्या किंवा राज्याच्या अर्थसंकल्पात केवळ योजनांची जंत्री आणि त्यांच्यासाठी केलेल्या तरतुदींचे कोट्यवधींचे आकडे असणे अपेक्षित नसते. तो काही निव्वळ जमा-खर्चाचा ताळेबंद नसतो. उलट, राज्याच्या आर्थिक वाटचालीची दिशा दाखविणारा, नव्या स्वप्नांचे मार्ग रेखून दाखविणारा आणि राज्याच्या आवाक्याची कल्पना देणारा तो दस्तावेज असावा लागतो. डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाचे अर्थमंत्री असताना मांडलेले अर्थसंकल्प या दृष्टीने पाहण्याजोगे आहेत. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी राज्याचे अर्थखाते सांभाळणारे उपमुख्यमंत्री अजित पवार 'या स्मारकासाठी अमुक कोटी आणि तमुक रुग्णालयासाठी इतके कोटी' असे सांगत होते; तेव्हा हे सारे आर्थिक ताळेबंदापेक्षा राजकीय फायद्यातोट्याचे हिशेब आहेत, हे लक्षात येत होते. अजित पवार यांनी कृषी, आरोग्य, मनुष्यबळ विकास, दळणवळण आणि उद्योग ही जी पंचसूत्री भाषणात सांगितली; तीच खरेतर सर्वांत महत्त्वाची होती आणि तिचे संकल्पनात्मक विवेचन त्यांनी अधिक करण्याची गरज होती. करोनाच्या संकटाने विकास आणि सरकारी योजनांच्या आजवरच्या सगळ्या मॉडेलचीच सर्वंकष फेररचना करण्याची गरज निर्माण झालेली आहे. मात्र, या दृष्टीने गेल्या वर्षीही नवा विचार झाला नव्हता. यंदा करोनाचे संकट आटोक्यात आलेले असताना हा विचार बजेटमधून नीट मांडला जायला हवा होता. तसा तो मांडला गेलेला नाही. उदाहरण द्यायचे तर, करोनाच्या प्रादुर्भावात महाराष्ट्राची किंवा इतरही राज्यांची अर्थव्यवस्था मुख्यत: कृषी आणि तदनुषंगिक उद्योगांनी तोलून धरली. त्यानंतर जरा संधी मिळताच सेवा क्षेत्रही झपाट्याने कामाला लागले. केंद्र सरकारने आणलेल्या तीन कृषी कायद्यांना विरोध होत असताना गेल्या वर्षी अजित पवार यांनी अर्थसंकल्पात 'बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन' या सप्तवार्षिक योजनेची घोषणा केली होती. २१०० कोटींच्या या योजनेत राज्य सरकारचे ५६० तर जागतिक बँकेचे चौदाशे कोटी रुपये असणार होते. या योजनेने गेल्या वर्षभरात नेमके किती यश मिळविले, किती कृषी उत्पन्न बाजार समित्यांपर्यंत किंवा शेतकऱ्यांपर्यंत ती पोहोचली, याचा सारा तपशील अर्थमंत्र्यांनी शुक्रवारी मांडणे, उचित झाले असते. असेच इतरही अनेक योजनांविषयी सांगता येईल. आम आदमी पक्षाच्या उदयानंतर तसेच या केंद्र सरकारच्या अनेक योजनांमुळे देशाच्या सगळ्यांच सरकारांवर समाजासाठी थेट काहीतरी करणाऱ्या योजना जाहीर करण्यासाठी प्रचंड दबाव येतो आहे. मात्र, अशा योजना यशस्वी होण्याची खरी गुरुकिल्ली त्यांच्या अंमलबजावणीत असते, हे समजावून घेण्याची गरज आहे. नियमित कर्जे फेडणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये देण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. प्रत्येक कर्जमाफीच्या वेळी कर्जफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांवर मात्र अन्याय होत आहे, अशी भावना उमटत असते. तिची दखल सरकारने घेतलेली दिसते. मात्र, अशी थेट मदत देण्याइतकेच शेतकऱ्यांना हक्काची, प्रामाणिक व्यवहार होणारी आणि दलालांची सद्दी संपविणारी बाजारपेठ देण्याची गरज आहे. याकडे अधिक लक्ष द्यायला हवे होते. राज्यातल्या त्रिस्तरीय आरोग्य व्यवस्थेची मुळापासून फेररचना करून ती लोकाभिमुख करण्याची गरज आहे. करोनाने ही गरज अधोरेखित केली. दिल्लीत अशी फेररचना झाली आहे. अजित पवार यांनी 'इंद्रायणी मेडिसिटी' या देशातल्या पहिल्या अशा प्रकल्पाची घोषणा केली. पुणे जिल्ह्यातली ही मेगामेडिसिटी राज्यभरातल्या सामान्य माणसांना कशी काय उपयोगी पडणार? की हा वैद्यकीय पर्यटनाकडे नजर ठेवून आखलेला प्रकल्प आहे? त्यापेक्षा, याच बजेटमधली केवळ महिलांसाठी १६ जिल्ह्यांमध्ये होणारी प्रत्येकी शंभर खाटांची प्रस्तावित रुग्णालये अधिक महत्त्वाची आहेत. महिलांसाठीच्या काही रुग्णालयांचे बांधकाम सुरू झाले असले तरी बजेटमध्येच प्रत्येक रुग्णालय कधी सुरू होणार, याची तारीखही जाहीर व्हायला हवी. यंदा आरोग्यासाठी ११ हजार कोटींची तरतूद आहे. गेल्या आर्थिक वर्षात आरोग्य खात्यासाठी केलेली सगळी तरतूद करोना असूनही वापरली गेली नव्हती. सार्वजनिक आरोग्य खात्याने केवळ ४७ टक्के रक्कम वापरली होती. असे होणार असेल तर बजेटमधल्या या आकड्यांना अर्थ तरी काय राहिला? अजित पवार यांनी गेल्या वर्षी स्मारकांच्या घोषणा केल्या. यंदाही केल्या. मात्र, ही स्मारके तयार होऊन त्यांची देखभाल होणेही महत्त्वाचे असते. छत्रपती संभाजी महाराजांचे देदीप्यमान स्मारक हवेच; पण मराठ्यांच्या स्वराज्याचे पहिले स्वप्न पाहणारे त्यांचे द्रष्टे आजोबा शहाजीराजे भोसले यांच्या समाधीवर कर्नाटकात चांगले छप्परही नाही. स्मारकांच्या घोषणा करताना सरकारला या गोष्टी कशा कळत नाहीत? स्मारकेच नव्हे तर सर्वच बाबतीत एकात्मिक, भविष्यवेधी विचार करणारे आणि महाराष्ट्रातील काही कोटी नागरिकांच्या दैनंदिन जीवनात गुणात्मक बदल घडवणारे अर्थसंकल्प आज हवे आहेत. त्या कसोटीवर हा अर्थसंकल्प उतरतो का, हे पुढील वर्षभर हे सरकार कसे काम करते, यावर ठरणार आहे.

# गो. म. वेदक विद्या मंदिर इ. १० वीच्या विद्यार्थ्यांचा आशिर्वाद प्रदान समारंभ संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**



तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो. म. वेदक विद्यामंदिर तळा इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद प्रदान समारंभ नुकताच पार पडला. याप्रसंगी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व तळा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, गो म वेदक विद्यालयाचे चेअरमन महेंद्र कजबजे, शाळा समिती सदस्य चंद्रकांत खातू, प्रभारी मुख्याध्यापक ढाकणे सर, ज्युनिअर कॉलेजचे प्रा. पाटील एन. सी., प्रा. सर्जे व्ही. बी. आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी भोईर सर व भागवत सर आणि विध्यार्थीनीनी सुंदर असे इशस्तवन व स्वागतगीत सादर केले. याप्रसंगी साक्षी रातवडकर, कार्तिक पाटील, सपना जगदाळे, मनस्वी सुर्वे, चिन्मय जगदाळे, व राज काटे या १० वीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच रोहीत भागवत व ढाकणे सर यांनीआशीर्वाद देऊन १०वी चा पेपर सोडवताना काय काळजी घ्यावी यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा. पाटील एन. सी. व प्रा. सर्जे व्ही.बी. यांनी विद्यार्थ्यांनाआशीर्वादपर मार्गदर्शन करून १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवणाऱ्या तळा ज्युनिअर कॉलेजमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घ्यावा असे आवाहन केले. शाळा समिती सदस्य श्री चंद्रकांत खातू यांनी सन २०२२ मध्ये इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक पटकाविनाऱ्या विद्यार्थ्यांना एक हजार रुपये बक्षिस जाहीर केले. याप्रसंगी गो. म. वेदक विद्यालयाचे चेअरमन महेंद्र कजबजे यांनी गरीब परिस्थितीमुळे मी उच्च शिक्षण घेऊ शकलो नाही ही खंत व्यक्त करीत आपल्यासाठी संस्थेने छोटा शिशू ते उच्च शिक्षणापर्यंतची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे त्यामुळे एकाही विद्यार्थ्यांनी अर्धवट शिक्षण सोडू नये असे आवाहन केले व कोविडच्या काळात सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण घेणे शक्य नसल्याने तळा परिसरातील मंदीर व सभागृहात गो. म. वेदक विद्यामंदिरच्या सर्व शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य केल्याने शिक्षकांचेही अभिनंदन केले. व विद्यार्थ्यांना आशीर्वादरुपी शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष स्थानावरून चंद्रकांत रोडे यांनी आपल्या जीवनातील वेगवेगळे खडतर अनुभव सांगून विद्यार्थ्यांनी आपली शाळा, शिक्षक वआई-वडीलांचे नावरोशनकरण्यासाठी जिद्दीने अभ्यास करून उंच भरारी घ्यावीअसेआवाहन केले. या समारंभाचे श्रीमती मचे मॅम यांनी निवेदन तर श्री ढाकणे सर यांनी आभार मानले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, सर्व शिक्षक, शिक्षेकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पदी शिवाजी शिंदेंची निवड

**दै.रायगड नगरी । माथेरान**




परखड स्वभाव आणि निस्वार्थीपणे आपल्या कामाला न्याय मिळवून देण्यासाठी,पक्षाच्या कामात स्वतःला झोकून देत सर्वसामान्य लोकांनची कामे करण्यात हातखंडा नेहमीच प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे माथेरान काँग्रेस पक्षाची मुलूखमैदान तोफ म्हणून ज्यांची संपूर्ण जिल्ह्यात ओळख निर्माण झाली आहे त्या माजी नगरसेवक तथा विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदेंच्या कार्याची दखल घेऊन रायगड जिल्ह्यातील काँग्रेस कमिटीने शिवाजी शिंदेंची जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती केली आहे.

त्याबाबतचे नियुक्ती पत्र त्यांना दि. ११ रोजी उलवे तालुका पनवेल येथील जोमा नारायण घरत समाज मंदिर हॉल शेलघर याठिकाणी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नवनिर्वाचित कार्यकारिणी बैठकीत रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या शुभहस्ते देण्यात आले यावेळी व्यासपीठावर अखिल भारतीय काँग्रेस कमिटी सचिव तथा कोकण प्रभारी बी. एम.संदीप, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी तथा प्रभारी रायगड उपाध्यक्षा चारुलता टोकस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सचिव तथा सह प्रभारी राणी अग्रवाल,माथेरान नगरीचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी महेंद्र शेठ घरत म्हणाले की, माथेरान सारख्या दुर्गम भागात नगरपरिषदेच्या सभागृहात काँग्रेस पक्षाचे एकमेव सदस्य शिवाजी शिंदेंनी सत्ताधारी गटाला वेळोवेळी आपल्या दोन वेळच्या नगरसेवक पदाच्या अनुभवाच्या जोरावर चुकीच्या कामांवर लक्ष केंद्रित करून शासनाचे ज्या पद्धतीने नुकसान होणार होते त्यावर आपला अंकुश कायम ठेवला होता. कुठल्याही प्रकारच्या आमिषाला बळी न पडता इमानेइतबारे आपल्या पदाला न्याय मिळवून दिला आहे.

तर मनोज खेडकर यांनी सांगितले की,शिवाजी शिंदेंनी ज्याप्रकारे सभागृहात सत्ताधाऱ्यांच्या विरोधात काँग्रेस पक्षाचा एकमेव सदस्य असताना देखील आपला दबदबा निर्माण केला होता तो खरोखरच वाखाणण्याजोगा असून त्यांनी आजवर आपल्या कार्यकाळात केवळ जनहितार्थ दृष्टीकोन नजरेसमोर ठेऊन येणाऱ्या प्रलोभनांना धुडकावून लावले ही पक्षासाठी खूपच अभिमानास्पद बाब आहे त्यांच्या या यशाचे गमक आणि निष्ठेने काम करण्याची क्षमता त्यांच्या अंगीकृत असल्यामुळे हा यशाचा चढता आलेख त्यांच्या एकूणच कार्यपद्धती मुळे दिसून येत आहे शिवाजी शिंदेंची जिल्हा सरचिटणीस पदावर नियुक्ती झाल्यामुळे याचा सर्व कार्यकर्त्यांना सार्थ अभिमान आहे असे सर्व कार्यकर्त्यांमधून सूर उमटत असून सर्व सोशल मिडियाच्या माध्यमांवर त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# खारघर स्वाभिमानी संघटनेतून शिवसेनेत जाहीर प्रवेश ; जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी केले स्वागत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्ष प्रवेशाची मालिका सुरू आहे.

आज पुन्हा एकदा खारघर विभागातील स्वाभिमानी संघटनेचे काही कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी महानगर प्रमुख रामदास शेवाळे, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील, कळंबोली शहर प्रमुख डी एन मिश्रा, कामोठे शहर प्रमुख राकेश गोवारी, खांदा कॉलनी शहर प्रमुख सदानंद शिर्के, खारघर शहर प्रमुख प्रकाश गायकवाड आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आदर्श नागरिक म्हणून जीवन कसे जगता येईल यासाठी प्रयत्न करा : रामशेठ ठाकूर

आवाहन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे देशाच्या विकासामध्ये असलेले योगदान व त्याग तसेच देश महासत्ता बनण्याची जी स्वप्ने पाहतो आहे त्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा फुले यांनी केलेले कार्य किती महत्वाचे आहे याची विद्यार्थ्यांना आठवण करून दिली. शिक्षणातून मिळणाऱ्या जीवन मूल्यांचा यथायोग्य वापर प्रत्यक्ष जीवनामध्ये करणे आवश्यक आहे. जीवनामध्ये येणा-या अडचणींवर मात करून पुढे जाणे महत्वाचे आहे. २१ व्या शतकातील आवाहने, जागतिकीकरण या सारख्या गोष्टींना आजच्या विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागणार आहे यासाठी विद्यार्थ्यांनी सक्षम राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ एन.आर.मढवी, डॉ आर ए. पाटील, उपप्राचार्य ए.जी.रोकडे तसेच विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदवीदान समारंभाच्या कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ आर.ए. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ प्रफुल्ल वशेणीकर, प्राध्यापिका सोनू तन्वर व प्रा. प्रवीण गायकर यांनी केले.

## १६५ दिवसांत पहिला नवीन पुल उभारल्यानंतर दुसऱ्या पुलासाठी पाच वर्षे!

ना. नितीन गडकरी यांनी ५ जून २०१७ रोजी पहिल्या नवीन सावित्री पुलाच्या या लोकार्पणासोबतच महाड ते छत्रपती शिवरायांच्या राजधानी रायगड रस्त्याचे चौपदरीकरण, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मगांव आंबडवेपर्यंतच्या रस्त्याचे चौपदरीकरण आणि मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या पुढील कामांचा शुभारंभ अशा तीन कामांची नियोजनबध्द कालावधीत पूर्तता करण्याची ग्वाही देऊन पनवेल ते इंदापूरपर्यंतचे पहिल्या टप्प्यातील काम का रखडले येत्या २ महिन्यांमध्ये चौपदरीकरणाचे भूसंपादन करून दिल्यास डिसेंबर २०१८ अखेरीस मुंबई ते गोवा हा राष्ट्रीय महामार्ग पूर्ण करून हा प्रवास केवळ ६ ते ८ तासांत करण्याचा शब्द याठिकाणी देऊन ना.गडकरी यांनी दिला होता.

गेल्या पाच वर्षांत पनवेल ते इंदापूर दरम्यानच्या कामात नागोठणेलगतच्या कोलेटीपर्यंत आणि अन्य काही गावांमध्ये रखडलेल्या भुसंपादनास आजमितीस कोणत्याही प्रकारची गती मिळाली नसून दुसऱ्या टप्प्यातील कामाची पूर्तता डिसेंबर २०१८ मध्ये होण्याऐवजी आता २०२२ उजाडूनदेखील येत्या २-३ वर्षांमध्ये हे काम पूर्णत्वास जाण्याऐवजी ठेकेदाराकडून अर्ध्यावर टाकून पळ काढण्याची ठेकेदाराची मानसिकता दिसून येत आहे. महाड ते छत्रपती शिवरायांच्या राजधानी रायगड रस्त्याचे चौपदरीकरण, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मगांव आंबडवेपर्यंतच्या रस्त्याचे चौपदरीकरण या दोन्ही कामांमध्ये चौपदरीकरणबाधितांना मोबदला देण्याचे काम रखडले असून दापोली मंडणगडच्या बाधितांनी प्रांताधिकारी कार्यालयासमोर आंबडवेपर्यंतच्या रस्त्याचे चौपदरीकरण भुसंपादनाच्या मोबदल्याच्या मागणीसाठी धरणे आंदोलन केले आहे.

महाड आणि पोलादपूरदरम्यानच्या सावित्री नदीवरील दुसऱ्या पुलाचा कोणताही गाजावाजा न करता वाहतुकीसाठी वापर सुरू करण्यात आला असून पहिल्या पुलाच्या कामाची थोडीशी डागडुजी सुरू करण्यात आली आहे. आगामी शिमगोत्सवामध्ये कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरून सुखकर होण्यासाठी महामार्ग बांधकाम विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. मात्र, या दुसऱ्या नवीन पुलावरून पोलादपूरच्या दिशेला उतरणाऱ्या वाहनांना दिशादर्शक फलकावर कोकणात जाण्यासाठी भोरच्या दिशेने मंडणगड असल्याचे दाखविण्यात आले आहे. यामुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची वाहने भोरच्या दिशेने चुकून जातात आणि त्यानंतर तब्बल १० किमी.अंतरावर वरंध घाट सुरू झाल्यावर पुन्हा मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर परत येऊन राजेवाडी मार्गे मंडणगडला जात असल्याने प्रवासी वाहनांना मनस्ताप दिसून येत आहे.

## वाहतूक कोंडीची समस्या सुटणार तरी कधी? खोपोलीकरांचा सवाल

पाली, अलिबाग, मुंबई, कर्जतला जाण्यासाठी या चौकातूनच जावे लागते.सध्या वाहनांची प्रचंड गर्दी होत आहे. रस्ते मात्र पूर्वीएवढेच आहेत. रस्त्यांची संख्या पूर्वीइतकीच आणि त्यांची लांबी-रुंदीसुद्धा पूर्वीइतकीच. गाड्यांची संख्या मात्र प्रचंड वाढली आहे. कमी वेळात पोहोचण्याच्या इच्छेने वाहन खरेदी केले जाते खरे; पण वाहतूक कोंडीतच तासन्तास वाया जातात. या परिस्थितीमुळे मनाचा संताप होतो. वाहन आपल्या मालकीचे असते. पण रस्ता आपल्या मालकीचा नसतो. मग वाहतूक कोंडीच्या ठिकाणी प्रचंड गदारोळ माजतो. प्रत्येकजण स्वत:ची गाडी वाटेल तशी पुढे दामटत राहतो. सर्व गाड्या एकमेकांच्या वाटा अडवून उभ्या राहतात. कोणीही पुढे जाऊ शकत नाही की मागे परतू शकत नाही. गाड्यांचे हॉर्न कर्कश आवाजात मोठमोठ्याने कोकलत असतात. काही जणांची भांडणे सुरु होतात. चौकात पोलिस उभे असो की नसो वाहतूक कोंडीची समस्या ही दिवसन दिवस वाढत चालली आहे. या अशा समस्यांचा तोडगा काढणार तरी कोण? सवाल खोपोलीकर विचारत आहेत.

# राज्यपाल यांच्या हस्ते डॉ. अफजल देवळेकर सरकार समाज रत्न सन्मान पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पनवेल**



देवळेकर यांना राजकारण व समाजकारणाची आवड असल्याने ते सरकार एंटरप्राइजेस रिअल इस्टेट कन्सल्टन्सी व्याप सांभाळत २०११ साली राजकारण व समाजकारणात सक्रिय झाले, व शाहुवाडी पन्हाळा विधानसभा २०१९ ची निवडणूक लढवली. तसेच पनवेल महानगरपालिका २०१७ नगरसेवक पद लढवले. या माध्यमातून त्यांनी राष्ट्रीय मानवाधिकार संघटना दिल्ली - भारत उपाध्यक्ष, पोलिस टाईम्स न्यूज २४ चे संस्थापक/ संचालक / सहमुख्य संपादक, अबस्ट्रॅक्ट व्हिजन फिल्म प्रोडक्शनचे संचालक संस्थापक, देवळेकर सरकार युवा शक्ती शाहूवाडी पन्हाळाचे संचालक संस्थापक, सत्यमेव जयते संस्था संघटना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, साई सिक्युरिटी को डायरेक्टर, मानवता फाउंडेशन महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, ऑल इंडिया शिफरस जनरल वर्कर्स युनियन जनरल सेक्रेटरी, पैलवान ग्रुप महाराष्ट्र राज्य सहसंचालक. अशा अनेक पदांच्या माध्यमातून सामाजिक राजकिय कार्य केले आहे. व अनेक आंदोलनात सहभागी होऊन गोरगरिबांना न्याय मिळवून दिला, अनाथ आश्रमण्णा निधी, दिव्यांगना व्हीलचेअर अनेक लोक लोकांच हॉस्पिटल ची बिले कमी करून देणे, बेघर लोकांना घरे ही मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. कोरोना कालखंडामध्ये अनेक पेशंट हॉस्पिटल मिळवून देणे, पेशंटच्या नातेवाईकांना अन्न पाण्याची सोय करून देणे. त्याकरीता त्यांना ऑल इंडिया, जरनॅलिस्ट क्रिडा युवारत्न पुरस्कार २०१२, आण्णाभाऊ साठे युवा समाजरत्न पुरस्कार २०१३, समता स्वराज पुरस्कार २०१४,मुंबई काँग्रेस आदर्श समाजरत्न पुरस्कार, शाहूवाडी पन्हाळा युवा उद्योजक पुरस्कार २०१३, विकास गंगा समाजरत्न पुरस्कार २०१५,जनमत न्यूजपेपर समाजरत्न पुरस्कार २०१९, ABRK फिल्म अवर्ड २०२१, पोलिस टाईम्स न्यूज २४ कोरोना युद्ध २०२१, व दिल्ली गव्हर्नमेंट युनिव्हर्सिटीची सोशल वर्क डॉक्टरेट पदवी असे अनेक पुरस्कार व पद देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. या सर्व कामाची दखल घेऊन त्यांना राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते समितीचा समाज रत्न पुरस्कार सम्मान राजभवन येथे पार पडलेल्या सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

# मुरुडमध्ये भाजपाने केला फटाक्यांच्या आतषबाजीत विजयाचा जल्लोष

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

देशामध्ये नुकत्याच झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने चार राज्यांमध्ये बहुमताने विजय मिळवल्याने मुरुड मधील शहरातील पुरकर नाका येथे भा.ज.पा.च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोष करत यावेळी उपस्थितांना पेढे वाटून विजयाचा आनंद व्यक्त केला !

भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, तालुका संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, तालुका उपाध्यक्ष परेश किल्लेकर, बाळा भगत, माजी तालुका अध्यक्ष तथा भटक्या विमुक्त जाती जिल्हाध्यक्ष शैलेश काते, तालुका सरचिटणीस नरेश वारगे, शहर अध्यक्ष उमेश माळी, सरचिटणीस अभिजित पानवलकर, शहर संपर्क प्रमुख महेश मानकर, कामगार आघाडी तालुका अध्यक्ष प्रवीण (बाबू) भाटकर, जगदीश पाटील यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# मा.मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त नगरपरिषदेच्या कार्यालयात मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक सुरेखा भणगे - शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी आरोग्य निरीक्षक सावंत, शिपाई लक्ष्मण निरगुडा, उमेश मोरे, संदेश कदम, रामदास धोत्रे आदी उपस्थित होते

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# स्त्रियांच्या श्रमाचे मूल्यमापन होण्याची गरज : डॉ. रवींद्र मर्दाने



**दै.रायगड नगरी । कर्जत**

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत विविध कामांची जबाबदारी अत्यंत काळजीपूर्वक व गांभीर्याने पार पाडणाऱ्या स्त्रिया कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत हातभात लावतात तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेतही योगदान देतात परंतु त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने स्त्रियांच्या श्रमाचे मूल्यमापन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना केले.

सह्याद्री सामाजिक संस्था, सद् भाव फाउंडेशन, मानवसेवा विकास संस्था व बँक ऑफ बडोदा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त कर्जत तालुक्यातील महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर, कर्तबगार महिलांचा सत्कार सोहळा व महिला बचत गट सदस्यांना विविध शासकीय योजनांबद्दल मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन पोसरी जवळील चंद्रभागा फॉर्म येथे करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर अग्रणी बँक व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी, तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे, पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की, बँक ऑफ बडोदाचे व्यवस्थापक कुशाल तितरे, दंत शल्यचिकित्सक डॉ. प्रियंका तुपे – म्हापणकर, कृषी अधिकारी चिंतामण लोहकरे, सह्याद्री सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अशोक तुपे, सद् भाव फौंडेशनच्या समन्वयक सुनंदा लाड, मंडळ अधिकारी भगवान बुरुड, तलाठी अश्विनी भामरे, तलाठी जयश्री मोरे उपस्थित होते.

डॉ. मर्दाने पुढे म्हणाले की, राज्यघटनेने स्त्री–पुरुष समानता अंगिकारली असली तरी यांच्यातील विषमतेची दरी कमी करण्यासाठी शासकीय धोरण व कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांच्या कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल व्हायला हवा. देशाच्या विविध भागात स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय – अत्याचाराची वाढती प्रकरणे व राजकीय संरक्षणामुळे प्रकरणे दाबून टाकण्याच्या हाथरससारख्या घटना, शबरीमाला प्रकरण इ. मुळे घटनेच्या उद्दिष्टांना तडा जात असल्याचे त्यांनी नमूद केले. अपवाद वगळता बँकेचे बहुतेक अधिकारी महिला बचत गट व बेरोजगारांना कर्ज देण्यास स्वारस्य दाखवत नाही, त्यांना चकरा मारायला लावतात हे लक्षात आणून देत अधिकाऱ्यांच्या नकारात्मक दृष्टिकोनामुळे शासनाचे उद्दिष्ट सफल होण्यास आडकाठी निर्माण होत असल्याने त्यांना तंबी देण्यात यावी, असे ते म्हणाले.कोकण कृषी विद्यापीठामार्फत देण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणाची माहिती देत त्याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

विजयकुमार कुलकर्णी यांनी जागतिक महिला दिनाची पार्श्वभूमी व यावर्षीची संकल्पना विशद करीत महिलांच्या सक्षमीकरणात बँकांचे फार मोठे योगदान असल्याचे सांगितले. महिलांनी आपले कौशल्य ओळखून त्यादृष्टीने कर्ज प्रकरणे सादर करावी तसेच ग्रामीण मंत्रालयांतर्गत असणाऱ्या स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी कुशाल तितरे यांनी बँक ऑफ बडोदाच्या, शीतल शेवाळे यांनी कृषी विभागाच्या तर बुरुड अण्णा यांनी तहसील कार्यालयामार्फत कातकरी समाजासाठी असलेल्या योजनांचा आढावा घेत त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले व अशोक तुपे, सुचिता लोहकरे, उज्वला लाड ,सुनिता जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी माणिकबाई तुपे, पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की, तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे, सद् भाव फौंडेशनच्या समन्वयक सुनंदा लाड, गृह उद्योजक उज्वला लाड व रुचिता लोहकरे, मंजुषा पाटील, दंत शल्यचिकित्सक प्रियंका तुपे–म्हापणकर, लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या पूनम पूर्वे यांचा मान्यवरांच्या हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला तत्पूर्वी बँक ऑफ बडोदा यांच्या तर्फे आयोजित आरोग्य शिबिरात डॉ करीम शेख, डॉ अब्दुल खान व डॉ प्रसाद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या आरोग्याची विनामूल्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनंदा लाड यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन चिंतामण लोहकरे यांनी केले.

# संक्षिप्त...

## ह.भ.प.गुरुवर्य राम महाराज आंबेकर यांना रायगड पुरस्कार प्रदान

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

ह. भ. प. गुरुवर्य राम महाराज आंबेकर यांना रायगड जिल्हा परिषदेचा मानाचा समजला जाणाला रायगड भुषण पुरस्कार राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री आदितीताई तटकरे,रजिप अध्यक्षा योगिता पारधी, बांधकाम सभापती निलिमाताई पाटील यांच्या सुभेहस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.

ह.भ. प. गुरुवर्य राम महाराज आंबेकर यांनी आध्यत्मिक क्षेत्रात केलेल्या प्रबोधनात्मक कार्याबद्दल त्यांना रायगड भुषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. मूळ गाव गंधारपाडा महाड येथील असणारे व अनेक वर्षांपासून पुई कॉलनी येथे वास्तव्याला असणारे राम महाराज यांनीळ कोलाड परिसरात आपल्या कीर्तन सेवेतून समाज प्रबोधनाचे काम केले आहे तसेच त्यांनी पुई गावातील तरुणांना हरिपाठा विषयी ओढ निर्माण केली आहे.तसेच त्याच्या नेतृत्वाखाली पुई ते पंढरपूर पायी दिंडी अनेक वर्षांपासून नित्यनेमाने जात आहे. त्यामुळे त्यांनी केलेल्या प्रबोधन कार्याबद्दल त्यांना रायगड भुषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी अशोक धामणसे, संजय मांडळुस्कर, सिद्धार्थ गायकवाड, चंद्रकांत लहाने,अनंत सानप, विठ्ठल पवार, प्रवीण धामणसे, सुनिल दळवी, शरद दिसले, चंद्रकांत फाटे, बाळा आंब्रूस्कर,तसेच समस्त पुई ग्रामस्थ व महिला मंडळ यांनी ह.भ.प.राम महाराज आंबेकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## आज विठ्ठलवाडी येथे विठ्ठल-रखुमाई उत्सव सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील श्री.क्षेत्र विठ्ठलवाडी येथे सोम.दि.१४ मार्च रोजी श्री. विठ्ठल–रखुमाई उत्सव व अखंड हरिनाम यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या २९ वर्षांची यशस्वी परंपरा राखत संपन्न होणारा हा सोहळा श्री.पद्मनाचार्य स्वामी शिष्यसांप्रदाय अम्रुतनाथस्वामी यांच्या प्रेरणेने व ब्रम्हीभुत गुरूवर्य त्रिनयनस्वामी,सदाशिवस्वामी,अंबरधरस्वामी,शिवानंदस्वामी, नरेंद्रस्वामी,नरेंद्रनाथस्वामी यांच्या क्रुपाशिर्वादाने गुरुवर्य सांप्रदाय भारती एकनाथ वाडेकर महाराज(जनार्दन स्वामी) यांच्या मार्गदर्शनाखाली सदानंदस्वामी,ह.भ.प.बाळकृष्ण धावडेमहाराज यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होणाऱ्या या या सप्ताह सोहळ्यात स.७ ते ९ अभ्यंगस्नान,९ ते १२ ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे ९,१२ व १५ व्या अध्यायांचे पारायण, दु.२ ते ४ वा.हळदीकुंकू समारंभ, ५ वा.ह.भ.प.प्रशांत महाराज दळव यांची प्रवचनसेवा,सायं.६ ते ७ वा.हरिपाठ,तर रात्रौ.९ वा.ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज माळी (नंदूरबार) यांची हरिकिर्तनरूपी सेवा तर शुक्र.दि.२६ रोजी स.७ ते ९ पारखी सोहळा तद्नंतर ९ ते ११ ह.भ.प.धावडेमहाराज यांचे काल्याचे किर्तन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

या सप्ताह सोहळ्यास माजी आ.धैर्यशील पाटील, पंडित पाटील,जि.प.सदस्य सुरेश खैरे,निलिमा पाटील,शेकाप कार्यकर्ते राजेश सानप,संभाजी पाटील,संभे सरपंच समिर महाबळे आदी मान्यवर उपस्थित राहणार असून या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ विठ्ठलवाडी, मुंबई, ठाणे,सुरत व श्री.विठ्ठल–रखुमाई सांस्कृतिक मंडळ विठ्ठलवाडी मेहनत घेत आहेत.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## मोठीजुई शाळेत किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन



**दै.रायगड नगरी । उरण**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लब उरण व पंचायत समिती उरण शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा मोठीजुई या शाळेत किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या आरोग्य शिबिरात उरणमधील प्रसिद्ध समाजसेविका डॉक्टर प्रीती गाडे स्त्रीरोग तज्ञ, लायन्स क्लबचे प्रेसिडेंट लायन नरेंद्रजी ठाकूर तसेच दंत चिकित्सक श्रीमती शिवानी गाडे व लायन्स क्लब टीम तसेच पंचायत समिती उरणच्या विषय साधन व्यक्ती ज्योती ठाकूर, शाळेचे मुख्याध्यापक सुभाष म्हात्रे, सहशिक्षिका रंजना म्हात्रे, संजय होळकर, दर्शन पाटील, संदीप गावंड, शर्मिला पाटील, यतीन म्हात्रे, ज्योती बामनकर उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे गुलाबाची रोपे देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर नरेंद्र ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आजही अशा प्रकारच्या मराठी शाळा पहायला मिळतात, शाळेचा परिसर, वर्ग सुशोभीकरण , शिक्षक सहकार्य व कार्यक्रमाचे उत्तम प्रकारे आयोजन पाहून समाधान व्यक्त केले व लायन्स क्लबच्या वतीने शक्य तेवढे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तदनंतर लायन्स प्रिती गाडे यांनी किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

मुलींची मानसिकता, बदलते वय, पुरक आहार, शारीरिक बदल, गुड टच बॅड टच व इतर महत्त्वाच्या बाबींवर सखोल चर्चा केली. तसेच श्रीम.शिवाजी गाडे यांनी शाळेतील सर्व उपस्थित मुलांची दंतचिकित्सा केली. तर कल्पना मॅडम व त्यांची टीम यांनी नेत्रचिकित्सा केले. नंतर मुलांना चॉकलेट वाटप करण्यात आले. शेवटी शिक्षक संजय होळकर यांनी आभार प्रदर्शन मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## श्री. स्वामी समर्थ मानव विकास अध्यात्मिक उपकेंद्र गिरणे येथे सत्संग मेळावा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

श्री स्वामी समर्थ मानव विकास अध्यात्मिक उपकेंद्र गिरणे येथे (दि.११) रोजी ब्रह्मभुत गुरुवर्य प.पु.अण्णासाहेब म्हस्के यांच्या कृपाशीर्वादाने आणि अस्मिता ताई यांच्या मार्गदर्शनाखाली सत्संग मेळावा मोठ्या उत्साहात व मंगलमय, भावपूर्ण वा–तावरणात संपन्न झाला.यावेळी गिरणे येथे तळा तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री स्वामी समर्थ मानव विकास अध्यात्मिक केंद्राचे प्रणेते प.पु.गुरवर्य अण्णासाहेब म्हस्के यांच्या प्रेरणेने व अस्मिता आई यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात अनेक केंद्र कार्यरत असून, या माध्यमातून लाखो महिला पुरुष सेवेकरी सक्रिय आहेत. या सर्वांच्या दृष्टीने आजच्या दिवसाचे खास महत्त्व असल्याने सर्वच जण या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतात. आज पहाटेच गिरणे येथे सकाळी ८ वा. भूपाळी आरती १०.३० वा.नैव्यद्य आरती ११ वा.स्वामीयान त्यानंतर महाप्रसाद ४. वा.प्रश्नोत्तरे संध्याकाळी ६. वा. नैवेद्य आरती संध्यकळी ६. वा. प्रफुल्लता इ म्हस्के यांचे स्वामी गीत गायन रात्री ८. वा.महाप्रसाद असा भक्तांनी लाभ घेतला.

उपस्थित सेवेकऱ्यांनी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मूर्तीला अभिषेक करून चरण तीर्थ घेऊन महाराजांना विनंती केली की, महाराज आपणच माझे गुरू, माता, पिता, बंधू, सखा, गुरु, सद्गुरू, परमगुरू, परात्पर गुरु व गुरुतत्व आहात माझा सांभाळ करा महिला, पुरुष सेवेकऱ्यांनी आपापल्या घरी यानिमित्ताने श्री स्वामी चरित्र, गुरुगीता या ग्रंथाची पारायणे व श्री स्वामी समर्थ मंत्राचा जप केला.

श्री स्वामी समर्थ मानव विकास अध्यात्मिक केंद्राचे प्रणेते प.पु.गुरवर्य अण्णासाहेब म्हस्के हे अंबरनाथ येथे गेले ४३ वर्षापासुन प.पु.अण्णांनी स्वामी समर्थ सेवा त्यांच्या राहत्या घरात सुरु केली आणि पुढे स्वामी जीवन मानव विकास केंद्राची निर्मिती केली अंबरनाथ सह कल्याण, कोकण, पुणे, गोवा या ठिकाणी त्यांनी मठ स्थापन केले.

तळा तालुक्यात गिरणे येथे स्वामी समर्थ मठ सहा वर्षापुर्वी बांधून झाले आहे त्याचे प.पु. अण्णा हे संस्थपक आहेत मागील अठरा वर्षे स्वामी समर्थ विकास केंद्र या नावाने कार्यक्रम राबविण्यात येतात त्याचप्रमाणे राणेचीवाडी,बोरघर,जोगवाडी,मुंढेची अळी या ठिकाणी कार्यक्रम होतात तसेच रोहा तालुक्यातील उदडवणे व माणगाव तालुक्यातील रातवाड येथे सप्ताह होत असतो.अहमदनगर जिल्ह्यातील पेमगीरी या गावचे रहिवासी असलेले कै.अण्णा साहेब म्हस्के यांचे निधन झाल्या नंतर त्यांच्या पत्नी अस्मिता आई ,आणि कन्या यांनी त्यांची धुरा हाती घेत सत्संग मेळावा पार पाडत असून श्री.स्वामी समर्थ यांचे विचार घरोघरी पोचविण्याचे काम करत आहेत.

मा.माधुरी आनंद सो यांचे कोर्टात

अर्जदाराचे वकील
ॲड.किशोर केंडे
ॲड.सौ.सुवर्णा केंडे

**जाहीर नोटीस**

मा.अति.जिल्हा व सत्र न्यायाधिश पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७/२०२२

१) श्री.जगदीश उर्फ जोगाराम चौधरी
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : व्यापार
२) सौ.हिरा जगदीश चौधरी
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.दापीवली, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
संभाव्य दत्तक पालक

आणि

३) कांचन मदन चौधरी
वय : ३० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.दापीवली, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड
४) मदन भवरलाल चौधरी
वय : ३३ वर्षे, व्यवसाय : व्यापार
रा.बुसी, ता.रानी, जि.पाली, राजस्थान राज्य — अर्जदार
नैसर्गिक आई वडील

हरकत म्हणणे देणेसाठी जाहीर नोटीस

१) तमाम जनतेस कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार वरील पत्यावर राहत आहेत. वर्षा मदन चौधरी मुलगी जन्म दि.१५/०९/२०१४ हिला दत्तक घेणे बाबत अर्ज.

बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २०१५ (२०१६ चा २) कलम ५६ (२) अंतर्गत नियम ५१ आणि दत्तक नियम ५५ प्रमाणे मा.न्यायालयात दाखल केला आहे.

२) अर्जदार क्र.१ व २ हे संभाव्य दत्तक पालक आणि मुलगी वर्षा मदन चौधरी हिचे नातेवाईक आजी आजोबा म्हणजेच नैसर्गिक आईचे आई वडील आहेत. बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २०१५ (२०१६ चा २) कलम ५६ (२) प्रमाणे नातेवाईक यांना दत्तक घेण्याची तरतूद आहे.

३) अर्जदार हे रा.दापीवली, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड रहिवासी आहेत ते मुळचे बुसी, ता.रानी, जि.पाली राजस्थान राज्य येथील आहेत.

४) मुलगी वर्षा मदन चौधरी हिचा जन्म नैसर्गिक पालक रा.दापीवली पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड यांचे पोटी दि.१५/०९/२०१४ रोजी पनवेल येथे झाला. दोघे मुलीला सोडून गेलेले आहेत.

५) मुलीचे नैसर्गिक आई वडील वेगळे राहतात. परस्पर संमत्तीने घटस्फोट घेणार आहेत. यासाठी मुलगी संभाव्य दत्तक पालक यांचेकडे दापीवली, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत आहेत. दत्तक पालक मुलीला (paramount welfare) योग्य शिक्षण व सुविधा देणार आहेत.

तरी अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे दत्तक परवानगी अर्जदार यांना प्रदान करण्याच्या कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास त्यांनी सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालय, पनवेल येथे दाखल कराव्यात. मुदत संपल्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांना दत्तक आई वडील जाहीर करून जन्म प्रमाणपत्रावर नाव बदलण्याची परवानगी दिली जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.५/०३/२०२२ रोजी माझे सहीने व मे.न्यायालयाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**अति.जिल्हा न्याया.पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**अति.जिल्हा न्याया.पनवेल**

**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल यांचे न्यायालयात**

पत्ता : पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती बिल्डींग, रायगड बाजार जवळ, मार्केट यार्ड, पनवेल–४१०२०६

३२ ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/२५–२०२१

**जाहीर नोटीस**

१) श्री.दादू पांडु डांगरकर
२) श्रीमती.शांती कानू भगत
रा.वाजे, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.भिमी सुदाम ठाकूर
रा.नेरे, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.गहु पदू मढवी
रा.उमरोली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
कै.भाऊ पांडु डांगरकर (मयत) वारस
५) श्री.हरिश्चंद्र भाऊ डांगरकर
रा.पालेखुर्द, पो.देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्री.जयदास भाऊ डांगरकर
७) श्री.अजय सखाराम डांगरकर
८) श्रीमती.पुष्पा सखाराम डांगरकर
९) श्री.राकेश सखाराम डांगरकर
अ.क्र.१,६ ते ९ सर्व रा.उसर्ली बुद्रुक,
पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
१०) श्रीमती.शारदा बाळाराम माळी
रा.खेरणे, पो.देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड
११) श्रीमती.बेबीबाई मधुकर जाधव
रा.बाहे, पो.देवकान्हे, ता.रोहा, जि.रायगड — अर्जदार/कुळ

विरुद्ध

१) श्री.जयेंद्र शंकरलाल शहा
२) श्रीमती.जयेश्री नरेंद्र शहा
३) श्री.अशोक लल्लुदास शहा
४) श्रीमती.कपिलाबाई शंकरलाल शहा
सर्व रा.नेरे, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्री.आत्माराम कमळू (काळू) पाटील
रा.रिटघर, ता.पनवेल, जि.रायगड — जमीन मालक/सामनेवाले

**जमिनीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | वाकडी | ९४ | १ | ०–६१–०<br>०–०७–४ पोख | १२.३० |

अर्जदार यांनी अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात वरील जमिनीचे जमीनमालक आहेत व महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ ग प्रमाणे खरेदी किंमत होणेकरिता अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, पनवेल यांच्या न्यायालयात दिनांक ३०/०८/२०२१ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या दाव्यामध्ये हितसंबंध असलेल्या अर्जदार व सामनेवाले स्वतः किंवा त्यांचे अधिकृत वारस अगर प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहून काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत द्यावयाची असल्यास दिनांक २९ मार्च २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता ठिकाण पनवेल येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपणांस (आपल्या विधीतज्ञांमार्फत) न्यायाधिकरण यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपण (आपल्या विधीतज्ञांमार्फत) कसुर कराल तर त्याबाबतीत आपणांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामांत गैरहजेरीत सुरूवात करण्यात येईल व प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार निर्णय दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०३/२०२२

**सही/–**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल, रायगड**

# सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे नागोठणे शहर सुरक्षित : अतुल झेंडे

**दै.रायगड नगरी । नागोठणे**



नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या कल्पकतेने नागोठणे शहरात मोक्याच्या विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यामुळे नागोठणे शहर सुरक्षित झाले असल्याचा विश्वास जिल्हा अतिरिक्त पोलिस अधीक्षक अतुल झेंडे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. नागोठणे शहरातील इतर अडचणी तसेच पो. नि. तानाजी नारनवर यांच्या कामकाजाविषयी माहिती जाणून घेण्यासाठी नागोठणे पोलिस ठाण्यामध्ये अतुल झेंडे यांनी शुक्रवारी सायंकाळी पत्रकार परिषद घेतली होती. त्यावेळी अतुल झेंडे यांनी पत्रकारांजवळ संवाद साधला.

दरम्यान यावेळी अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल झेंडे यांनी नागोठणे शहरातील नुक्कड गल्ली व छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील ट्रॅफिक संदर्भातील उपाययोजनांच्या बाबतीत पो. नि. तानाजी नारनवर यांना मार्गदर्शन केले. यावेळी अतुल झेंडे यांच्या समवेत पोलिस उपविभागीय अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, पो. नि. तानाजी नारनवर व पो. ह. विनोद पाटील उपस्थित होते. दरम्यान पत्रकार परिषदेपूर्वी अतुल झेंडे यांनी नागोठणे परिसरातील कंपन्यांच्या अधिकारी वर्गाची बैठक घेऊन त्यांनाही आवश्यक ते मार्गदर्शन केले.

पत्रकारांशी बोलताना जिल्हा अतिरिक्त पोलिस अधीक्षक अतुल झेंडे पुढे म्हणाले की, नागोठणे पोलिस ठाण्याची नविन इमारतीचे काम कोविडमुळे थांबले आहे. तसेच इमारत सुसज्ज करण्यासाठी ३५ ते ४० लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. इमारतीसाठी लागणारा निधी नागोठणे परिसरातील विविध कंपन्यांच्या सीएसआर फंडातून पूर्ण करण्यात येईल व येत्या पावसाळ्याच्या आगोदर नागोठणे पोलिस ठाण्याची सुसज्ज इमारत उभी राहील असा विश्वासही अतुल झेंडे यांनी यावेळी व्यक्त केला. नागोठण्यातील ट्राफिकची अडचण सोडविण्यासाठी पोलिस ठाण्यात पब्लिक अनाऊंसमेंट सर्व्हिस सुरु करुन वाहतूक कोंडी करणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवून त्यांना पोलिस ठाण्यातूनच ध्वनिक्षेपक यंत्रणेद्वारे सुचना करुन वाहतूक कोंडी नियंत्रणात ठेवण्यात येणार असल्याची माहितीही शेवटी जिल्हा अतिरिक्त पोलिस अधीक्षक अतुल झेंडे यांनी दिली. दरम्यान अतुल झेंडे यांच्याशी चर्चा करताना उपस्थित पत्रकारांनी पो. नि. तानाजी नारनवर यांच्या कामकाजाविषयी कौतुक करून वेळेप्रसंगी नारनवर आपला पोलिस खाक्या देखील दाखवितात अशी माहिती पत्रकारांनी दिली.

# अखेर एमएमआरडीएच्या मार्फत ब्लॉक्स वरील ग्रीट काढण्यास सुरुवात

**दै.रायगड नगरी । माथेरान**

अनेक वर्षानंतर माथेरान मध्ये एमएमआरडीएच्या माध्यमातून विकासाची गंगा आल्याने पर्यटन वाढीच्या दृष्टिकोनातुन प्रलंबित कामे खऱ्या अर्थाने तडीस जात आहेत. परंतु होत असलेली कामे मुजोर ठेकेदाराला अभय दिल्याने त्यावर कोणाचाही अंकुश नसल्यामुळेच हम करे सो कायदा प्रमाणे नियोजन पूर्ण कामे केली जात नव्हती. एमएमआरडीए म्हणजे एक दुभती गाय काही राजकीय पक्षांना लाभल्यामुळे ठेकेदाराने केलेल्या कामांवर जराही आक्षेप घेतला गेला नाही. ठेकेदार नक्की गावाच्या विकासास चालना देत आहे की निविदेतील कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी सपाटा लावत आहे.



ज्या ज्या ठिकाणी जांभ्या आणि काळ्या दगडात संरक्षक भिंती उभारल्या जात आहेत त्या निश्चितपणे काही वर्षे तरी तग धरू शकतात का ? याबाबत नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे त्यामुळे पुढील काळात पुन्हा एकदा यासाठी नगरपरिषदेला स्वतःचा खर्च करून केलेल्या कामांची डागडुजी करावी लागणार आहे असे नागरिकांमधून बोलले जात आहे.संपूर्ण भागात क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात येत आहेत ह्या ब्लॉक्सची लेंथ कशा पद्धतीने आहे. ते कच्च्या स्वरूपाचे आहेत हे स्पष्टपणे दिसत असताना देखील याकडे अनेकांनी कानाडोळा केलेला आहे.

लावण्यात आलेले हे ब्लॉक्स अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने त्यावर पांघरूण घालण्यासाठी ठेकेदाराने संपूर्ण ग्रीट टाकली होती जेणेकरून ह्या ब्लॉक्सचा पर्दाफाश होऊ नये परंतु मागील काही वर्षापूर्वी गावात अशाच पद्धतीने क्ले पेव्हर ब्लॉक्स रस्त्याची कामे सुरू असताना राजकीय लोकांच्या इशाऱ्यावर येथील स्वतःला इंजिनियर समजणाऱ्या काही हुशार नागरिकांनी आभाळ डोक्यावर घेतले होते. परंतु आता मात्र तीच मंडळी काही कारणास्तव बघ्याची भूमिका पार पाडत आहेत. याकामी दि.९ रोजी एम.एम. आर.डी.ए.च्या विकास कामांवर प्रशासनाचे दुर्लक्ष ह्या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध झाल्यामुळे एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब आपल्या संबंधित कामगारांमार्फत कच्च्या ब्लॉक्स वरील ग्रीट काढण्यास सुरुवात केली आहे ग्रीटमुळे होणाऱ्या धुळीचे प्रमाण कमी होणार असल्याने नागरिकांनी आणि पर्यटकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.


## संक्षिप्त...

### यशवंतराव चव्हाण यांना कर्जत नगरपरिषदेच्यावतीने अभिवादन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना कर्जत नगरपरिषदेच्यावतीने अभिवादन करण्यात आले.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी रविंद्र लाड, कल्याणी लोखंडे, अविनाश पवार, निकेश फाळे, सुदेश गायकवाड, मुकेश परदेशी गोपाळ शेलार आदी उपस्थित होते.



### राज्यस्तरीय ऑनलाईन खुली वकृत्व स्पर्धेची द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली ओवी पुलेकर



**दै.रायगड नगरी । मुरुड**


शब्दधन सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य नीति आयोग भारत सरकार च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन खुली वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेकरिता प्रसिद्ध लेखक कवी तथा परिक्षक-विकास काशिनाथ शिंदे व प्रशिक्षक प्रा. राहुल पोपट तावरे यांनी स्पर्धेचे परिक्षण केले, या स्पर्धाकरिता प्रथम क्रमांक,व्दितीय क्रमांक , तृतीय क्रमांक व उतेजनार्थ बक्षीस ठेवण्यात आली होती.

राजे छत्रपती संभाजी महाराज्यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून नंबर घोषित करण्यात आले. या मधुन मुरुड शहरातील सुविद्या इंग्लिश मेडीयम सिनियर के.जी. मध्ये शिकणारी ५ वर्षीय मुलगी -ओवी मनोज पुलेकर हिने जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांविषयी उत्तम पणे आपल्या वक्तृत्वाने ऑनलाईन प्रक्षेकांना मोहित केले .उत्तम वकृत्वाने ओवी पुलेकर ला राज्यस्तरीय ऑनलाईन खुली वकृत्व स्पर्धेची व्दितीय क्रमांकाची मानकरी ठरविण्यात आली. व्दितीय क्रमांकाचा नंबर घोषित होताच ओवी ला सोशल मीडियावर व्हॉटस ॲप , फेसबुक व सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे. सुविद्या इंग्लिश मिडीयम स्कुल च्या संचालिका सीमा शेडगे यांनी ओवी चे कौतुक करुन शाळेत बक्षीस दिले.

## पनवेल परिसरातील बाजारपेठा सजल्या विविध रंगांसह पिचकारीने

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अवघ्या काही दिवसांवर आलेल्या होळीसाठी पनवेल परिसरासह इतर ठिकाणच्या बाजारपेठा या आता विविध प्रकारच्या रंगाने त्याचप्रमाणे विविध आकाराच्या पिचकाऱ्यांनी भरल्या असून यात नैसर्गिक रंगाला चांगलीच मागणी आहे.



सध्या बाजारपेठेत यंदाच्या होळीच्या वस्तू खरेदीसाठी ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने बाजारपेठेत उत्साह आहे. विशेषकरून आपल्या आईवडीलांसमवेत बाजारात येणाऱ्या बच्चे कंपनीकडून रंगपंचमीचे साहित्य खरेदी करण्याकडे कल वाढला आहे. दरम्यान, येत्या काही दिवसात ग्राहकांच्या गर्दीमध्ये अजून वाढ होण्याची शक्यता विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे. भारतीय परंपरेत महत्त्वाचा समजला जाणारा होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. पनवेल परिसर हे येथील स्थानिक आगरी कोळी भूमिपुत्रांचे शहर असल्याने होळीचा सण पारंपारिक पध्दतीने येथील भूमिपुत्रांकडून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यानिमित्त शहर व गावठाण भागात होळी पेटवत त्याभोवती प्रदक्षिणा मारत प्रार्थना केली जाते. होळीच्या खरेदीसाठी शहरातील प्रमुख बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात ग्राहक येत असतात.

परंतु, मागील दोन वर्ष कोरोनाच्या सावटामुळे अन्य सणांप्रमाणेच या सणालाही मर्यादा आल्या होत्या. मात्र आता हे सावट दूर झाले असून होळीच्या वस्तू खरेदीसाठी ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षीपेक्षा यंदा खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची संख्याही वाढली असल्याचे सांगण्यात येते. होळीनंतर येणारे धूलिवंदन हे दोन दिवस रंगाची उधळण करीत नागरिक रंग खेळण्याचा आनंद घेतात. या दिवसांची तयारी करण्यासाठी बाजारामध्ये रंगाची खरेदी करण्यात ग्राहक मग्न आहेत. ग्राहकांची पसंती कोरड्या व नैसर्गिक रंगांना जास्त आहे. रंग उडवण्याची पिचकारी खरेदी करण्यासही चांगला प्रतिसाद आहे.

## क्रांतीदिनाच्या पूर्व तयारीची स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी २० मार्च रोजी होणाऱ्या क्रांतीदिनाच्या पूर्व तयारीची बैठक रायगड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेवून त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले.

या बैठकीत कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यात आली. सायंकाळी ४ वाजता अभिवादन सभा आयोजित करण्यात आली आहे. तत्पूर्वी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून मिरवणुकीला प्रारंभ करण्यात येणार आहे. त्यानंतर चवदार तळ्यातील पाण्याचे प्राशन करून व नंतर अभिवादन करून सभेची सुरूवात करण्यात येणार आहे.

अभिवादन सभेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पक्षप्रमुख मनोज संसारे उपस्थित राहणार आहेत. तर सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे हे राहणार आहेत. तसेच प्रमुख अतिथी म्हणून अशोक वाघमारे, अमित हिरवे, भगवान गरुड, बाळाराम जाधव आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या शिकू आनंदे या अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या शिकू आनंदे या अभियाना अंतर्गत दर शनिवारी, दप्तरावीन शाळा हा प्रयोग वीर हुतात्मा भाई कोतवाल, प्राथमिक शाळेत फेब्रुवारी महिन्यापासून घेण्यात येत आहे.

शनिवारी वेगवेळ्या विषयात प्रत्यक्ष मुलांचा सहभाग त्यांच्यातील कलगुणांना वाव मिळावा पुस्तकांशिवाय एक दिवस, इतर विषय, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थांशी हितगुज करण्यासाठी विविध क्षेत्रात कामं करणाऱ्या यशस्वीत्यांचे चर्चा सत्र, खेळ, आणि बराच काही हे यानिमित्ताने कृतीत साकारत आहे.

आज सर्व क्षेत्रातील महिलांची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी याच उद्देशाने येथील काही विद्यार्थिनींनी समाजातील आदर्श, कर्तृत्वान, महिलांची वेशभूषा करून, त्यांचे विचार व्यक्त केले.

सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ठ पद्धतीचा ग्रुप नृत्य याचे देखील सादरीकरण विद्यार्थिनींनी केले.विशेष म्हणजे यावेळी विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली होती.

**आज महिला दिन सप्ताहच्या समारोपाला पोलीस प्रशासन आणि मुख्याधिकारी यांना शाळेत विद्यार्थांशी हितगुज करण्याची शाळा विभागाने संधी दिली. भारावून जावं असं कार्य, शालेय शिक्षकांकडून होताना दिसतंय. आणि नक्कीच पुढील येणाऱ्या पिढीसाठी आपण सर्व मिळून आपल्या शाळेतील हिऱ्यांना पैलू पडूयात.शालेय शिक्षक, मुख्याध्यापक आणि संपूर्ण टीमचे आभार**

**सुरेखा भणगे- शिंदे, मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक माथेरान नगरपरिषद**



## धामोते-नेरळ येथे कातकरी उत्थान अभियान कार्यक्रम आयोजन



**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड जिल्ह्यामध्ये आदिवासी बांधवांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे प्रेरणेतून कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.


त्या अनुषंगाने कर्जत तालुक्यातील धामोते-नेरळ येथील आगरी समाज हॉल येथे आदिवासी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी, कोव्हिड लसीकरण, आधारकार्ड नोंदणी शिबीर ठेवण्यात आले होते व आदिवासी मेळाव्यात ७०० जातीचे दाखले, ५० रेशनकार्ड , २० उत्पन्नाचे दाखले तयार करण्यात आले प्रातिनीधीक स्वरुपात काही मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

याप्रसंगी आदिवासी महिलांना प्रशिक्षण देण्यात आले व श्रमिक क्रांती संघटने सुरेखा दळवी यांनी आदिवासीचे आरोग्य व बालविवाह रोखणे तसेच स्थालांतर रोखणे व रोजगार निर्मिती या विषयावर प्रबोधनपर मार्गदर्शन केले, कार्यक्रमाप्रसंगी कर्जत उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) अजित नैराळे, कर्जत तहसिलदार विक्रम देशमुख,श्रमिक क्रांती संघटना प्रमुख सुरेखा दळवी, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, नायब तहसीलदार बुरसे, वैद्यकीय अधिकारी पवार, मंडळ अधिकारी नेरळ संतोष जांभळे, अरूण विशे, तलाठी, कोतवाल यांचे सह कर्जत तालुक्यातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपविभाग अधिकारी अजित नैराळे यांनी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आदिवासी विकासासाठी सप्तसूत्री निश्चित करण्यात आली आहे या बाबत कालबध्द कार्यक्रम आखुन त्यांचे योग्य नियोजन करून त्याची अंमलबजावणी करून आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सतत कार्यरत राहू असे सांगितले.

## राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न ; करियरकट्टा या उपक्रमाचा नॅक मुल्यांकनामध्ये होणारा फायदा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कळंबोली, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणारा करियर कट्टा या उपक्रमांतर्गत राज्यातील महाविद्यालयीन प्राचार्य व समन्वयक यांच्यासाठी - 'करियर कट्टा या उपक्रमाचा नॅक मुल्यांकनामध्ये होणारा फायदा ' याविषयी राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक १२ मार्च रोजी ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले होते.



सदर कार्यशाळे मधे महाविद्यालयात जे अनेक उपक्रम केले जातात व त्याची नोंद ठेवणे आणि आपल्या कॉलेज चे पररल मूल्यांकन करत असताना त्या सर्व योग्य पद्धतीने पररल उीरळींशीळर मधे बसवणे व आपल्या महाविद्यालायला चांगली ग्रेड मिळवणे हे खूप महत्वाचे झाले आहे. करियर कट्टा ह्या उपक्रमात आपण कशा पद्धतीने आपले उपक्रम पररल लीळींशीळर मधे आपल्या उपयोगी पडतील ह्याची आपणास माहिती व्हावी म्हणून ह्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .

ह्या कार्यशाळेचे उद्घाटन शिक्षण महर्षि दादासाहेब लिमये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. सी. लहूपचांग यांनी उद्घाटन शुभेच्छा देवून केले. त्यांनंतर संत गाडघे बाबा विद्यापीठ अमरावती येथील मानवता शाखेचे डीन डॉ. अविनाश मोहरील यांनी नॅक मूल्यांकन साठी करियर कट्टा चे उपक्रम हे कसे अधिक प्रमाणात मिळू शकतात याचे त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. राणी शितोळे. शाहू मंदिर महाविद्यालय यांनी करियर कट्टा उपक्रमा मधे कोणकोणते उपक्रम आहेत आणि ते उपक्रम राबावल्याने नॅक मूल्यांकन मधे अधिक गुण कसे मिळू शकतात ह्या संबंधी मार्गदर्शन केले. शेवटी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र अध्यक्ष माननीय यशवंत शितोळे सर यांनी मार्गदर्शन केले. त्या प्रसंगी शितोळे सर यांनी करियर कट्टा हा नॅक मूल्यांकन साठी महत्वाचा आहे, एवढेच लक्षात न घेता विद्यार्थ्यांना पुढे जाण्यासाठी चा एक मार्ग आहे. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन मुंबई विभागाच्या विभागीय समन्वयक डॉ. प्रिती महाजन यांनी केले. सदर कार्यशाळेस महाराष्ट्रातून अनेक महाविद्यालयाचे ५५० प्राचार्य व नॅक समन्वयक उपस्थित होते.

## जेएनपीटीमध्ये पंतप्रधान गति-शक्ती कार्यक्रमांतर्गत विविध प्रकल्प सुरू

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदर प्राधिकरणाने पंतप्रधान 'गती-शक्ती' कार्यक्रमांतर्गत अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. पंतप्रधान 'गती-शक्ती' - मल्टी-मॉडल कनेक्टिव्हिटीसाठी राष्ट्रीय मास्टर प्लान'च्या अनुषंगाने सुरू असलेल्या प्रकल्पांची प्रगती व लाभ अधोरेखित करण्यासाठी ज ने बंदर प्राधिकरणाने आज 'माध्यमांशी संवाद' कार्यक्रम आयोजित केला होता.

ज.ने बंदर प्राधिकारणाचे अध्यक्ष श्री संजय सेठी, यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी रेलवे, सीमाशुल्क, पीएसए मुंबई, आयपीआरसीएल, एनएचएआयचे वरिष्ठ अधिकारी व ज ने बंदर प्राधिकरणाचे विभागाध्यक्ष उपस्थित होते. 'माध्यम संवाद' कार्यक्रमास केंद्र व राज्य सरकारच्या मंत्रालयातील विविध प्रमुख अधिका-यांनी ऑनलाइन सहभाग घेतला होता.

पंतप्रधान 'गती-शक्ती' कार्यक्रमाचे उद्दिष्ट लॉजिस्टिक खर्च कमी करणे, आयात-निर्यात व्यापार कार्यक्षम बनवण्यासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करणे आणि खर्च व वेळेची बचत करून आणि देशातील विकासाचा वेग वाढवून नागरिकांना फायदा देणे हे आहे. देशाच्या एकात्मिक आर्थिक विकासामध्ये या कार्यक्रमाची महत्त्वपूर्ण भूमिका असेल. हा कार्यक्रम विकासाचे सात इंजिन - रस्ते, रेल्वे, विमानतळ, बंदरे, जन वाहतूक, जलमार्ग आणि लॉजिस्टिक यावर आधारित आहे.

ज.ने बंदर प्राधिकरणाच्या प्रकल्पांचे गती-शक्तीच्या उद्दिष्ट पूर्तिमध्ये योगदान याविषयी माहिती देताना श्री संजय सेठी, म्हणाले की,जेएनपीए-सेझ, चौथा कंटेनर टर्मिनल, अतिरिक्त लिक्विड कार्गो जेट्टी सारखे प्रकल्प भारतातील बंदर-आधारित औद्योगिकीकरणासाठी मार्गदर्शक ठरतील तसेच या प्रकल्पांमुळे आयात-निर्यात व्यापार अधिक कार्यक्षम होण्यास मदत होईल. जेएनपीए हे अत्याधुनिक सुविधा पुरवणारे देशातील आघाडीचे बंदर आहे. गति-शक्ती अंतर्गत जेएनपीए मध्ये सुरू असलेल्या प्रकल्पांमुळे देशाची सर्वसमावेशक प्रगती व विकासामध्ये नक्कीच मदत होईल. पंतप्रधान 'गती-शक्ती' - राष्ट्रीय मास्टर प्लान अंतर्गत जेएनपीए मध्ये कोस्टल बर्थ, जेएनपीए -सेझ, सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा, चौथा कंटेनर टर्मिनल, रास्ते रुंदीकरण, वर्धा आणि जालना येथील ड्राय पोर्ट, रोपॅक्स/रोरो साठी बर्थिंग सुविधा, कॉमन रेलयार्ड, अतिरिक्त लिक्विड कार्गो जेट्टी असे विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांमुळे आयात-निर्यात व्यापारास चालना मिळेल आणि देशाच्या अर्थव्यवस्थेस सुद्धा गति मिळेल.

'माध्यम संवादा' दरम्यान, जेएनपीए ने माध्यम प्रतिनिधींना व्हिडिओच्या माध्यमातून सादरीकरण करून विविध प्रकल्पांची माहिती दिली, त्यानंतर जेएनपीएचे अध्यक्ष श्री संजय सेठी यांच्याशी संवाद सत्र पार पडले.

